# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७४७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/११/२०१६

**१) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १४/११/२०१६ रोजी २३.३० वा. दर. यातील आरोपीने फिर्यादीची अल्पवयीन मुलीला मुलीला लग्नाचे आमीष दाखवुन फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३६३,३६६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाधव पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) विवाहीतेला शारीरीक व मानसीक त्रास देवुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १४/०४/२०१५ ते १५/११/२०१६ रोजी ०९.०० पर्यन्त. यातील तिन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादींच्या सोबत आरोपी क्र. ०१ ने लग्न झाल्यानंतर काही दिवस चांगले वागुन ०४ लाख रुपये आपले आई वडीलाकडुन आण असे म्हणुन मारहाण करुन यातील आरोपीतांनी शारीरीक व मानसीक छळ केल्याने व शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने पोस्टे. पाचपावली नागपुर येथे अप क्र. ००/१६ कलम ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ भांदवि चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. तोडासे पोस्टे भंडारा हे करीत आहेत.

**३) भांडण करुन काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १०/११/२०१६ रोजी १०.०० वा. दर. यातील फिर्यादी जखमी सुनील पाडुरंग गुर्वे रा. नवेगाव हा आपल्या घरासमोरील रोडवर मोबाईल फोन वर बोलत असतांना यातील तिन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फोनवर पोलीसांना बोलवितोस असे बोलुन भांडण करुन हाता पायांनी व काठीनी तोंडावर, कमरेवर छातीवर व पाठीवर जबर मारहान करुन दुखापत केल्याने जखमी यांची पत्नी सौ. सुनीता गुर्वे हिचे चौकशीत ठेवलेल्या तक्रारीची चौकशी करुन चौकशीत जखमीचे बयान व डॉ. परीक्षण अहवाल वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास नापोशी. पडोळे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) खेळाडु बाद झाल्याचे चुकीचे निर्णय दिल्याच्या कारणावरुन लाखडी खुंठयाने मारुन जखमी केले व मोटार सायकलची नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १४/११/२०१६ रोजी १३.२५ वा. दर. चिचटोला येथे कबड्डी चे स्पर्धा दरम्यान मौजा पिंपळगाव व लाखनी या दोन संघाचा सामना सुरु असतांना पिंपळगाव संघातील सुभाष उईके या खेंळाडुनी तीन खेळाडुंना बाद केले असता पंचानी दोनी खेळाडु बाद झाल्याचे चुकीचे निर्णय देल्याने रेफरी सोबत पिंपळगावचे खेळाडु सोबत संवाद साधीत असतांनी यातील आरोपीतांनी संगनमत करुन त्याच्या सोबत फिर्यादी व जखमीला लाथाबुक्यांनी मारपीट केले आरोपी क्र. ०३ ने बैल बांधण्याच्या खुंठ उपटुन त्या खुंठयाने दोन्ही जखमीचे डोक्यावर मारुन दुखापत केले व जखमी सोबत शिवनकर यांच्या मोटार सायकलला लाखडी खुंठाने मारुन गाडीची तोड फोड करुन अंदाजे ४,०००/—रु. ची नुकसान केल्याने फिर्यादी भुपेन्द्र अनिल दोनोडे वय २४ वर्ष, रा. पिंपळगाव सडक यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,४२७,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**४) अवैध दारु अडयांवर धाडी . :—**

दिनांक १५/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे भंडारा, जवारहनगर करडी व साकोली येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी दारु कि. १५००/—रू. व ७२० मिली लिटर कि. २००/—रु. असा एकुण कि. १,७००/—रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२**

१६/११/१६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.